REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# हळद उत्पादनाविषयी अद्ययावत माहिती मिळविण्याची माध्यमे एक अभ्यास

सौ. पाटोळे एस. पी.
ग्रंथपाल , यशवंतराव चव्हाण महाविद्यालय , पाचवड ता. वाई जि. सातारा .

**सारांश**

प्रस्तूत संशोधनाची व्याप्ती सातारा जिल्हयातील हळद उत्पादक शेतक—यांच्या माहितीविषयक गरजांच्या अभ्यासाची घेण्यात आली आहे. सातारा जिल्हयात अकरा तालूके आहेत. सातारा, कोरेगाव, खटाव, वाई, माण, फलटण, खंडाळा, जावली, महाबळेश्वर व पाटण अशा अकरा तालुक्यांपैकी सातारा, कोरेगाव, वाई, खंडाळा, जावळी व पाटण अशा सात तालुक्यांमध्ये हळदीचे उत्पादन मोठया प्रमाणावर होत असल्याने प्रस्तूत संशोधन हे या तालुक्यांपुरते मर्यादित आहे. या संशोधनात हळद उत्पादनामध्ये विकसित करण्याकरिता शेतक—यांच्या माहितीविषयक गरजा काय आहेत? माहिती कशी व कोठून मिळविली जाते ? माहिती मिळविण्यात काय अडचणी निर्माण होतात? या सर्व प्रश्नांची उकल करणे गरजेचे आहे.

**KEY WORDS :** हळद उत्पादन, अद्ययावत माहिती, माहितीविषयक स्त्रोत.

## प्रस्तावना

ग्रंथालय शास्त्र हे सर्व शास्त्रांचे शास्त्र आहे. या विधानातच ग्रंथालयाचा परिचय होतो. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र हे एक सामाजिक शास्त्रच मानले जाते. या शास्त्राचा विकास हा त्या विषयाचा अभ्यास आणि त्या विषयातील संशोधन यावर अवलंबून असतो.

आजही भारतीय शेतक—यांमध्ये फार मोठया प्रमाणात अज्ञान आहे. शेतक—यांना सध्याच्या माहिती तंत्रज्ञान युगातसुध्दा शेती आधूनिकीकरणाचे तंत्रज्ञान माहिती नाही. जरी माहिती असली तरी ते हाताळण्याचे ज्ञान नाही त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा वापर न करता आल्यामुळे उत्पादन कमी होते. तसेच बाजारपेठेच्या ज्ञानाच्या अभावामुळे शेतीमाल कोठे विकावा, केव्हा विकावा हे कळत नाही जागतिक बाजारपेठेची माहिती मिळत नसल्यामुळे आपला माल कवडीमोल किंमतीला स्थानिक पातळीवरच विकावा लागतो हे शेतक—यांचे अज्ञान आहे म्हणून आर्थिक संकटात सापडला आहे.

देशाचा विकास हा ग्रामीण भारताच्या विकासावर अवलंबून आहे. म्हणून खेडयाकडे चला या महात्मा गांधी यांच्या उक्तीप्रमाणे सध्या जागतिकीकरणच्या कालावधीत ग्रामीण विकास योजना व त्यांची प्रभावी अंमलबजावणी महत्त्वाची आहे. कारण देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया शेती हा आहे. शेती व माहिती हे भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक आहेत.



एकविसावे शतक हे माहितीचे युग आहे. सर्वसामान्य शेतक—यांना माहितीविषयक स्त्रोत माहित नाहीत. सातारा जिल्हयामध्ये नगदी पीक म्हणून हळद हे पीक घेतले जाते. म्हणून एका विशिष्ट पिकाबददल शेतक—यांना कृषी तंत्रज्ञान विषय माहिती योग्य व वेळेवर मिळावी आणि या

कृषी तंत्रज्ञान माहितीच्या आधारे शेतक–यांना हळदीची उत्तम शेती करता यावी. शेतक–यांच्या आधुनिक कृषी तंत्रज्ञानविषयक नेमकया गरजा, समस्या व वेगवेगळे माहिती स्त्रोत माहित व्हावेत, जेणे करून शेतक–यांना बाजारपेठेच्या दृष्टीकोनातून व संशोधकाला त्याच्या संशोधन कार्यातून माहितीविषयक गरजा लक्षात घेऊन त्याचा माहिती केंद्र व संशोधन संस्था यांच्या माध्यमातून योग्य विचार विनिमय होऊन याचा जिल्हयातील व राज्यातील प्रत्येक शेतक–यांस कृषी तंत्रज्ञान माहिती विषयक गरजांचा फायदा होईल.

## संशोधनाची उद्दिष्टे

संशोधन हे त्यांच्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने पूर्ण करवे लागते आणि उद्दिष्टांच्या अनुशंगाने संशोधनासाठी योग्य संशोधन पध्दती निवडावी लागते. उद्दिष्टे जर स्पष्ट असतील तर अचूक दिशा प्राप्त होते आणि त्या अनुशंगाने माहिती संकलित केली जाते.

1. सतारा जिल्हयातील हळद उत्पादक शेतक–यांच्या सर्व निविष्ठांचा अभ्यास करणे ( जमिन, पाणी , खते, बियाणे, रोग व किड नियंत्रण आणि वेळेत हळद विक्रि)
2. हळदीची उत्पादन क्षमता व दर्जा वाढवण्यासाठी हळद उत्पादक शेतक–यांना विविध माध्यमांव्दारे मिळणा–या माहितीविषयक सेवांचा शोध घेणे.

## संशोधन पध्दती

एखादया विषयामध्ये संशोधन करण्यासाठी वर्णनात्मक, ऐतिहासिक व प्रायोगिक या संशोधन पध्दतीचा वापर केला जातो. प्रस्तूत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला.

## वर्णनात्मक संशोधन पध्दती –

ही वर्तमान काळाशी संबंधीत असते या पध्दतीत सदयस्थितीचे वर्णन केले जाते. एखाद्या घटनेचा संस्थेचा उपक्रम यांच्या सद्यस्थितीचा सर्वंकष अभ्यास करुन त्यांच्या प्रगतीच्या स्थितीचा सखोल अभ्यास केला जातो. सदर अभ्यास करण्यासाठी निरीक्षण तंत्र, प्रश्नावली व मुलाखत या पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. सदर अभ्यास करण्यासाठी जिल्हा हा घटक निवडून त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे. यासाठी विशिष्ट आकडेवारी आणि आलेख पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

## लक्ष्य समूहाची निवड


सदर संशोधनासाठी सातारा जिल्हयातील प्रत्येक हळद उत्पादक शेतक–यांपर्यंत पोहचणे शक्य नसल्याने एकूण हळद उत्पादक शेतक–यांपैकी ज्या शेतक–यांची 1/2 ते 5 एकर दरम्यान हळद शेती आहे अशा निवडक 180 शेतक–यांची निवड लॉटरी पध्दतीने करण्यात आली. तसेच कृषी अधिका–यांची मुलाखत घेण्यात आली.

## विषय विवेचन

**हळद उत्पादनाविषयी अद्ययावत माहिती मिळविण्याची माध्यमे**

| अ. नं. | तपशिल | आकडेवारी |
|---|---|---|
| 1 | रेडिओ | 25 |
| 2 | टी. व्ही. | 92 |
| 3 | कृषी विज्ञान केंद्र | 127 |
| 4 | शासकीय कार्यालय | 69 |
| 5 | इंटरनेट | 23 |
| 6 | किसान कॉल सेंटर | 25 |

वरील तक्त्यावरून असे दिसते की हळद उत्पादनाविषयी अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी शेतकरी विविध माध्यमांचा वापर करतात. त्यामध्ये 13.88% शेतकरी रेडिओचा, 51.11% शेतकरी हे टि. व्ही. चा , 70. 55% शेतकरी कृषी विज्ञान केंद्राचा, 38.33% शेतकरी शासकीय कार्यालयाचा तर 12.77% शेतकरी हे इंटरनेटचा व 13.88% शेतकरी किसान कॉल सेंटरचा वापर करताना दिसतात




वरील आलेखावरून असे दिसते की हळद उत्पादनाविषयी अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी शेतकरी विविध माध्यमांचा वापर करतात. त्यामध्ये सर्वात जास्त 70.55% शेतकरी कृषी विज्ञान केंद्राचा तर सर्वात कमी 12.77% शेतकरी हे इंटरनेटचा वापर करताना दिसतात

### शेतकरी आणि रेडिओचा वापर

| अ. नं. | त्पशिल | आकडेवारी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 25 | 13.88 |
| 2 | नाही | 155 | 86.12 |

- वरील तक्त्यावरून असे दिसते की फक्त 13.88 शेतकरी हे रेडिओवर शेतीविषयक कार्यक्रम ऐकतात तर 86. 12% शेतकरी हे रेडिओ ऐकत नाहीत.

### आकाशवाणी केंद्रावरील कार्यक्रम

| अ. नं. | आकाशवाणी केंद्रवरील कार्यक्रम | कार्यक्रम |
|---|---|---|
| 1 | सातारा | किसानवाणी<br>कृषीवार्ता<br>हवामान अंदाज |
| 2 | पूणे | . |

जे 13.88 % शेतकरी रेडिओ ऐकतात ते सातारा आकाशवाणी केंद्रावरील किसानवाणी हा कार्यक्रम तसेच कृषीवार्ता, हवामान अंदाज असे शेतीशी संबंधीत कार्यक्रम नित्य ऐकतात.

### टी. व्ही. वरील कृषीविषयक माहितीचे कार्यक्रम

| अ. नं. | तपशिल | आकडेवारी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 156 | 86.66 |
| 2 | नाही | 24 | 13.34 |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, 86.66% शेतकरी हे टि. व्ही. वरील कृषीविषयक कार्यक्रम पाहतात. 13.34% शेतकरी हे कार्यक्रम पाहत नाहीत.

### कृषीविषयक कार्यक्रमासाठी चॅनल व कार्यक्रम

| अ.नं. | टी. व्ही. चॅनेल | कार्यक्रमाचे नाव | आकडेवारी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | दुरदर्शन सहयाद्री | आमची माती आमची माणसं | 118 | 65.55 |
| 2 | ई टी. व्ही. | अन्नदाता | 98 | 54.44 |
| 3 | स्टार माझाा | पीकपाणी, सातबाराच्या बातम्या | 109 | 60.55 |

यामध्ये 65.55% शेतकरी हे दुरदर्शन सहयाद्रीवरील आमची माती आमची माणसं हा कार्यक्रम पाहतात. 54.44% शेतकरी ई टी. व्ही. वरील अन्नदाता हा कार्यक्रम पाहतात तर 60.55% शेतकरी स्टार माझाा वरील पीक पी व सातबाराच्या बातम्या हे कार्यक्रम पाहतात.

### कृषीविषयक कार्यक्रम न पाहण्याची कारणे

| अ.नं. | तपशिल | आकडेवारी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | टी. व्ही. नाही | 00 | 00 |
| 2 | गैरसोईची वेळ | 24 | 13.33 |
| 3 | वीज नसते | 00 | 00 |

टी. व्ही. न पाहणा–यांचे प्रमाण 13.33% आहे. त्यामध्ये सर्वच्या सर्व शेतक–यांनी गैरसोयीची वेळ हेच कारण सांगितले आहे.

### अद्ययावत कृषीविषयक माहितीसाठी इंटरनेटचा वापर

| अ. नं. | तपशिल | आकडेवारी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 17 | 9.45 |
| 2 | नाही | 163 | 90.55 |

वरील तक्त्यामध्ये इंटरनेट वापरणारंमध्ये फक्त 9.45% हळद उत्पादक शेतकरी हे इंटरनेटच्या माध्यमातून कृषी विषयक माहिती घेतात व 90.55% शेतकरी हे इंटरनेटचा वापर करत नाहीत.

### इंटरनेटचा वापर न करण्याची कारणे

| अ. नं. | तपशिल | आकडेवारी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | इंटरनेट वापरण्याची माहिती नाही | 75 | 41.66 |
| 2 | जवळपास इंटरनेटची सोय नाही | 122 | 67.77 |

इंटरनेट वापर न करणारांचे प्रमाण 90.55% एवढे प्रचंड आहे. इंटरनेट न वापरण्याच्या कारणांचा अभ्यास केला असता 41.66% शेतक–यांना इंटरनेट वापराची माहिती नाही. 67.77% शेतक–याकडे इंटरनेट उपलब्ध नाही.

**कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन**


| अ. नं. | तपशिल | आकडेवारी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 147 | 81.66 |
| 2 | नाही | 33 | 18.34 |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, 81.66% शेतकरी हे कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन घेतात. तर 18.34% शेतकरी हे कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन घेत नाहीत.

**विविध प्रकल्पांसाठी कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन**

| अ. नं. | तपशिल | आकडेवारी |
|---|---|---|
| 1 | पिके, फळे यांच्या पिकांवरील प्रयोगाचे प्रात्यक्षिक | 87 |
| 2 | पाणी देण्याच्या विविध आधुनिक पध्दती जाणून घेणे | 79 |
| 3 | पाणी परीक्षण | 56 |
| 4 | माती परीक्षण | 82 |
| 5 | पिकांचा दर्जा सुधारण्यासाठी | 72 |
| 6 | दर्जेदार रोपे तयार करण्यासाठी | 39 |
| 7 | खते, पशुखाद्ये इ. विषयी मार्गदर्शन | 46 |
| 8 | कृषी सहली | 24 |
| 9 | व्यवसाय प्रशिक्षण | 31 |

हळद उत्पादक शेतकरी हे वेगवेगळया संदर्भामध्ये कृषी विज्ञान मार्गदर्शन घेतात यामध्ये फळे, पिके यांच्या पिकावरील प्रयोगाचे प्रात्यक्षिक जाणून घेण्यासाठी 87 शेतकरी मार्गदर्शन घेतात. 79 शेतकरी पाणी देण्याच्या आधुनिक पध्दती जाणून घेण्यासाठी, 56 शेतकरी हे पाणी परिक्षणासाठी, 72 शेतकरी हे माती परिक्षणासाठी, 82 शेतकरी हे पिकांचा दर्जा सुधारण्यासाठी, 39 शेतकरी हे दर्जेदार रोपे तयार करण्यासाठी, 46 शेतकरी खते व पशुखाद्ये इत्यादीची माहिती घेण्यासाठी, तर 24 शेतकरी हे कृषी सहलीबाबत तर 31 शेतकरी हे व्यवसाय प्रशिक्षणासंदर्भात कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन घेतात.




हळद उत्पादक शेतकरी हे वेगवेगळया संदर्भामध्ये कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन घेतात यामध्ये फळे, पिके यांच्या पिकावरील प्रयोगाचे प्रात्यक्षिक जाणून घेण्यासाठी 48.33% शेतकरी मार्गदर्शन घेतात. 43.88% शेतकरी पाणी देण्याच्या आधुनिक पध्दती जाणून घेण्यासाठी, 45.55% शेतकरी हे माती परिक्षणासाठी कृषी विज्ञान केंद्राचे मार्गदर्शन घेतात.

## निष्कर्ष

1. सातारा जिल्हयातील हळद उत्पादक शेतक—यांनी माहिती मिळविण्यासाठी शेती व शेतीपूरक व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ शेतक—यांनी घेतलेला दिसत नाही.
2. हळद लागवड तंत्रज्ञानाची माहिती शेतक—यांना देण्यामध्ये कृषी कार्यालयाचे योगदान जास्त आहे.
3. 100 टक्के शेतक—यांना हळदीच्या वाणांची (जातींची) माहिती आहे.
4. हळदीच्या विविध वाणांची माहिती मिळविण्यासाठी शेतक—यांना अनुभवी शेतकरी व कृषी कार्यालय यांची मोठया प्रमाणात मदत होते.
5. हळद शेतीसाठी विहीर व कॅनॉल चे पाणी शेतकरी वापर करत असलेले दिसतात.
6. हळद उत्पादक शेतक—यांनी पाणी देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केलेला दिसतो. यामध्ये ठिबक सिंचनाचा वापर करणारांची संख्या अधिक आहे.
7. हळद उत्पादक शेतकरी शेतीसाठी स्वत' कुटुंबियांसह मजूर यांचा वापर चांगल्या प्रकारे करताना दिसतात.
8. शेतीपूरक व्यवसाय करणा—या शेतक—यांमध्ये दुग्ध व्यवसायाचे प्रमाण जास्त दिसते.

## संदर्भ ग्रंथ


- नाडगोंडे गुरुनाथः सामाजिक संशोधन पध्दती, कोल्हापूर, फडके प्रकाशन, 1999
- डॉ. क—हाडे बी. एम.ः शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.
- भांडारकर, वि. रा.ः शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नूतन प्रकाशन, 1993
- थोरात, लक्ष्मणः ग्रंथालय व माहितीशास्त्र, पुणे, नूतन प्रकाशन, 2009
- पाठक अरुणचंद्र शं.(संपा.)ः महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर सातारा जिल्हा, महाराष्ट्र शासन, मुंबई दर्शनिका विभाग, 1999
- अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग — महाराष्ट्र शासन : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सातारा जिल्हा 2012.
- निकासे, सत्यप्रकाश : आधुनिक ग्रंथालयांचे व्यवस्थापन, नागपूर, प्रकाशन, 2003.
- जोशी, लक्ष्मणशास्त्री : मराठी विश्वकोश : खंड 16 मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ.

- Rowky Jenifer, Basics of Information Technology, Londan, Clire BNingley,1988
- भुजबळ, बी. जी., कांदा लसूण आलं हळद, पुणे ओम प्रकाशन, 2005.
- बाखरु, हरी कृष्ण, बहुगुणी वनौषधी, पुणे, रोहन प्रकाशन, 2005.





**सौ. पाटोळे एस. पी.**
**ग्रंथपाल , यशवंतराव चव्हाण महाविद्यालय , पाचवड ता. वाई जि. सातारा .**